Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. १६ मे २०२६ । वर्ष १ । अंक ४१ । पाने २।
DIGITAL EDITION

भडगांव हादरला, अल्पवयीन मुलीवर अत्याचार!
(पान २ वर)



## Selected

### नीट पेपरफुटी प्रकरणातील 'मास्टरमाईंड'ला अटक

**पुणे:** नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठी कारवाई केली आहे. पेपरफुटी प्रकरणी पुण्यातून रसायनशास्त्राच्या सेवानिवृत्त प्राध्यापकाला अटक करण्यात आली आहे. पी. व्ही कुलकर्णी असे या सेवानिवृत्त प्राध्यापकाचे नाव असून, तो नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या वतीने परीक्षा प्रक्रियेत सहभागी होता आणि त्याच्याकडे प्रश्नपत्रिकाही उपलब्ध होत्या, अशी माहिती समोर आली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचा तोच मास्टरमाईंड असल्याचे सीबीआयच्या तपासात आढळून आले आहे. मास्टरमाईंडला अटक याबाबत इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने पी. व्ही. कुलकर्णी या सेवानिवृत्त प्राध्यापकाला पुण्यातून अटक केली आहे. पेपरफुटीचा तोच मास्टरमाईंड असल्याचे तपासात समोर आले आहे. कुलकर्णी एनटीएच्या वतीने परीक्षेच्या प्रक्रियेत सहभागी होता.

## मुलीचे लग्न पार पाडून आनंदात घरी परतलेल्या दांपत्यावर काळाचा घाला

# शिरपूर हादरले! मुलाकडून आई-वडिलांची निर्घृण हत्या!

## संतप्त नागरिकांनी आरोपी मुलाला पकडून पोलिसांच्या ताब्यात दिले

जन सम्राट टाईम्स

**धुळे (शिरपूर) । :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहरात एका सख्या मुलानेच आपल्या जन्मदात्या आई-वडिलांची निर्घृण हत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसर हादरला आहे. महावीर सोसायटी परिसरात घडलेल्या या भीषण प्रकाराने मानवी नात्यांनाच काळीमा फासला असून, ज्या घरात काही तासांपूर्वी मुलीच्या लग्नाचा आनंद होता, त्याच घरात काही क्षणांत शोककळा पसरली.

मृत दांपत्याची नावे इंदाराम आणि रंजू देवी अशी असून, त्यांनी नुकतेच आपल्या मुलीचे लग्न पार पाडले होते. आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास ते आनंदाने घरी परतले होते. मात्र, घरी आल्यानंतर किरकोळ कारणावरून आई-वडिलांनी मुलाला त्याच्या पत्नीसमोर सुनावल्याचे सांगितले जात आहे.

याच गोष्टीचा राग मनात धरून संशयित मुलगा संतापाच्या भरात हिंसक बनला. प्राथमिक माहितीनुसार, आरोपीने घरात ठेवलेले मुसळ उचलून आई-वडिलांच्या डोक्यावर सपासप वार केले. अचानक झालेल्या या भीषण हल्ल्यात दोघेही गंभीर



जखमी झाले. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या दांपत्याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली. हत्या केल्यानंतर आरोपी मुलाने घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, घरातून येणारा आरडाओरडा ऐकून शेजारी आणि परिसरातील नागरिक तात्काळ घटनास्थळी धावले.

संतप्त नागरिकांनी आरोपीला शिताफीने पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. घटनेची माहिती मिळताच शिरपूर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. या दुहेरी हत्येमुळे संपूर्ण शिरपूर शहरात हळहळ व्यक्त होत असून,



"पत्नीसमोर रागावल्याच्या कारणावरून मुलानेच आई-वडिलांचा जीव घेणे" ही बाब नागरिकांना सुन्न करणारी ठरली आहे. परिसरातील नागरिकांकडून आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.

### आरोपिला पोलिसांनी घेतले ताब्यात

विशेष म्हणजे, ज्या घरात काही वेळापूर्वीच मुलीच्या लग्नानंतर आनंदाचे वातावरण होते, त्याच घरात अचानक मृत्यूचे सावट पसरल्याने नातेवाईकांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. परिसरातील अनेकांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख आणि संताप व्यक्त केला आहे.दरम्यान, शिरपूर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून, त्याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## मुक्ताईनगरात आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात

### २५ परिचारिका व परिचारकांचा सन्मान

जन सम्राट टाईम्स

**मुक्ताईनगर | प्रतिनिधी:** आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त मुक्ताईनगर येथे आरोग्य क्षेत्रातील सेवाभावी कार्य करणाऱ्या परिचारिका व परिचारकांचा विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी संघ व योगमाया प्रतिष्ठान, मुक्ताईनगर यांच्या संयुक्त विद्यमाने उपजिल्हा रुग्णालयात आयोजित करण्यात आलेल्या या कृतज्ञता सोहळ्यात एकूण २५ परिचारिका व परिचारकांचा गौरव करण्यात आला. रुग्णसेवेलाच ईश्वरसेवा मानून दिवस-रात्र निःस्वार्थपणे सेवा देणाऱ्या परिचारिकांच्या कार्याचा गौरव करणे हा या कार्यक्रमामागील मुख्य उद्देश होता. कोरोना महामारीपासून ते आजतागायत नागरिकांच्या आरोग्याची जबाबदारी खांद्यावर घेत अथक परिश्रम करणाऱ्या आरोग्य कर्मचाऱ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन २५ परिचारिका व परिचारकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात बोलताना प्रमुख अतिथी डॉ. मनोज महाजन यांनी परिचारिकांच्या कार्याचे कौतुक करत सांगितले की, "डॉक्टरांच्या उपचारांना परिचारिकांच्या मायेची,



तत्परतेची आणि संवेदनशील सेवेची जोड मिळाल्याशिवाय रुग्ण पूर्णपणे बरा होऊ शकत नाही. समाजासाठी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आणि प्रेरणादायी आहे." कार्यक्रमाला मुक्ताईनगर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, नागरिक, वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित

सन्मानित झालेल्या परिचारिकांनी आयोजक संस्थांचे मनापासून आभार मानत हा सन्मान आपल्या कार्याला नवी प्रेरणा देणारा असल्याची भावना व्यक्त केली.\या भेटीदरम्यान बापू बागुल, शंकर खरात, संजय अहिरे, बापू बाविस्कर, सागर थिवरे यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंजनी नदीवर वाळू माफियांचा धुडगूस; महसूल विभागाची धडक कारवाई !

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी ;** धरणगाव तालुक्यातील बाबुळगाव परिसरात अंजनी नदीपात्रावर अवैध वाळू माफियांनी पुन्हा एकदा धुडगूस घातल्याचे समोर आले असून, महसूल विभागाने धडक कारवाई करत विनापरवाना वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईमुळे अवैध गौण खनिज माफियांमध्ये खळबळ उडाली असून, प्रशासनाने आता अधिक कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दि. ४ मे २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास बाबुळगाव येथील अंजनी नदी पात्रातून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर वाळू उपसा व वाहतूक सुरू असल्याची माहिती महसूल विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे ग्राम महसूल अधिकारी दीपक विजयसिंग पाटील यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पाहणीदरम्यान ट्रॅक्टर क्रमांक MH-19 EA-6810 मधून विनापरवाना वाळू वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले. नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करून



शासनाचा महसूल बुडवला जात असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे. प्रशासनाच्या या कारवाईमुळे वाळू माफियांच्या कारवायांवर काही प्रमाणात आळा बसण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अंजनी नदीपात्रातून सुरू असलेल्या अवैध वाळू उपशामुळे नदीचे नैसर्गिक स्वरूप धोक्यात आले आहे. सततच्या उत्खननामुळे नदीतील जलसाठ्यावर परिणाम होत असून भूजल पातळीही झपाट्याने घसरत आहे. भविष्यात या प्रकारामुळे गंभीर पाणीटंचाई निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. याचा थेट फटका शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना बसत असल्याची प्रतिक्रिया परिसरातून उमटत आहे. या प्रकरणी समाधान विठ्ठल पाटील (रा. धरणगाव) याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२), ६२ तसेच गौण खनिज अधिनियम १९५७ च्या कलम २१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### लूट थांबवण्यासाठी मोहीम राबवावी

दरम्यान, महसूल विभागाने केलेल्या या धडक कारवाईचे नागरिकांनी स्वागत केले असून, नदीपात्रांची सुरू असलेली लूट थांबवण्यासाठी सातत्याने मोहीम राबवावी, अशी मागणी शेतकरी व पर्यावरणप्रेमींनी केली आहे. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई झाल्यासच अशा प्रकारांना आळा बसेल, अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

## नराधम शिक्षकाचे घृणास्पद कृत्य उघड; जिल्हा परिषद शाळेत चिमुरडीवर अत्याचार..!

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील एका गावात माणुसकीला काळिमा फासणारी एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली आहे. येथील जिल्हा परिषद शाळेतील एका नराधम शिक्षकाने इयत्ता चौथीमध्ये शिकणाऱ्या अवघ्या १० वर्षांच्या चिमुरडीवर मागील दोन वर्षांपासून सातत्याने लैंगिक अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे.

याप्रकरणी धरणगाव पोलीस ठाण्यात नराधम शिक्षक नंदलाल नारायण मराठे याच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलगी ही आपल्या कुटुंबियांसह धरणगाव तालुक्यातील एका गावात राहते. ती जि.प. शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिकत आहे.

संशयित आरोपी शिक्षक नंदलाल मराठे हा तिला शाळा भरण्यापूर्वी सकाळी १० वाजता झाडू मारण्याच्या बहाण्याने शाळेत बोलावून घेत असे. शाळा रिकामी असल्याचा फायदा घेऊन तो तिच्यासोबत घृणास्पद कृत्ये करायचा. इतकेच नव्हे, तर तिला मोबाईलवर अश्लील व्हिडिओ दाखवून तिचे लैंगिक शोषण करत



असे. या प्रकाराला विरोध केल्यास तो तिला मारहाण करायचा आणि कोणाला सांगितल्यास "तुझे आई-वडील मरून जातील," अशी धमकी देऊन तिला गप्प बसवत असे. शाळा सुटल्यानंतर सुट्यांमध्ये मुलगी आपल्या मावशीकडे गेली असता, तिथे तिची तब्येत बिघडली आणि तिने जेवण करणे बंद केले. नातेवाईकांनी तिला विश्वासात घेतले असता, तिने रडत रडत तिच्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला. ३० एप्रिल २०२६ रोजी शाळेच्या शेवटच्या दिवशीही या नराधम शिक्षकाने तिच्यावर अत्याचार केला होता. या प्रकरणी मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून धरणगाव पोलिसांनी आरोपी नंदलाल मराठे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष पवार करत आहेत. या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात संताप व्यक्त होत असून, अशा नराधम शिक्षकावर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## शिंदेंच्या बालेकिल्ल्यात महायुतीत धुसफूस!

जन सम्राट टाईम्स

**ठाणे :** ठाणे महापालिकेच्या महासभेत पुन्हा एकदा सत्ताधारी महायुतीतील शिवसेना आणि भाजप आमनेसामने आल्याचे चित्र पाहायला मिळाले. सत्तेत एकत्र असलेल्या दोन्ही पक्षांतील वाद महासभेत उफाळून आल्याने सभागृहात जोरदार गदारोळ झाला. शिवसेनेने प्रशासनाच्या मदतीने अवघ्या पाच मिनिटांत २३२ विषय बहुमताच्या जोरावर मंजूर केल्याचा गंभीर आरोप भाजपच्या नगरसेवकांनी करत सभागृहाबाहेर घोषणाबाजी केली. या संपूर्ण प्रकारामुळे ठाणे महापालिकेतील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. शुक्रवारी झालेल्या सलग तिसऱ्या महासभेत शिवसेना आणि भाजप नगरसेवकांमधील संघर्ष पुन्हा समोर आला. महासभेत शिवसेनेचे नगरसेवक राजेश मोरे यांनी एल निनोमुळे भविष्यात उद्भवणाऱ्या परिस्थितीबाबत लक्षवेधी सूचना मांडली होती. या विषयावर प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी सचिवांना विषयपत्रिकेवरील कामकाज सुरू करण्याचे निर्देश दिले. मात्र, त्यावेळी भाजपचे नगरसेवक संजय वाघुले, नम्रता कोळी, मृणाल पेंडसे यांच्यासह इतर नगरसेवकांनी विषयपत्रिकेपूर्वी नगरसेवकांनी विचारलेल्या प्रश्नांवर चर्चा व्हावी, अशी मागणी लावून धरली. भाजपचे नगरसेवक चर्चेसाठी आग्रही असतानाच, उपमहापौर कृष्णा पाटील यांनी आपले आसन सोडून थेट सभागृहात येत पहिल्या विषयालाच आक्षेप नोंदवला. तरीही शिवसेनेने बहुमताच्या जोरावर एक विषय वगळता सर्व विषय मंजूर करून घेतल्याचा आरोप भाजपकडून करण्यात आला. या विरोधात भाजपच्या नगरसेवकांनी महापौरांच्या आसनासमोर ठिय्या आंदोलन सुरू केले. याचदरम्यान



शिवसेनेचे नगरसेवक मनोज शिंदे आणि राजेश मोरे यांनी अचानक राष्ट्रगीत म्हणण्यास सुरुवात केल्याचा आरोप भाजपने केला. सभागृहाचे कामकाज अधिकृतरीत्या संपले नसताना राष्ट्रगीत सुरू केल्यामुळे राष्ट्रगीताचा अवमान झाल्याचा गंभीर आरोप भाजपच्या नगरसेवकांनी केला आहे. भाजपचे नगरसेवक संजय वाघुले यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला. तसेच, "सातत्याने अवघ्या काही मिनिटांत २०० ते ३०० विषय मंजूर करण्याची पद्धत लोकशाहीला घातक असून भाजप त्याला विरोध करत राहील," असे भाजपचे गटनेते मुकेश मोकाशी यांनी स्पष्ट केले. महासभेनंतर भाजपच्या नगरसेवकांनी पालिका मुख्यालयापासून थेट नौपाडा पोलीस ठाण्यापर्यंत मोर्चा काढत निवेदन सादर केले. राष्ट्रगीताचा अवमान झाल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी कारवाईची मागणी केली. दरम्यान, शिवसेनेकडून भाजपवरच टीका करण्यात आली. "सत्तेत सहभागी असूनही भाजप जाणूनबुजून गोंधळ घालत आहे. मात्र, अशी भूमिका कपटीपणाची आहे. जर त्यांना सहकार्य करायचे नसेल, तर त्यांनी सत्तेतून बाहेर पडून विरोधी पक्षाची भूमिका घ्यावी," अशी टीका शिवसेनेच्या माजी महापौर मीनाक्षी शिंदे यांनी केली. या महासभेतील गदारोळामुळे ठाणे महापालिकेतील महायुतीमध्ये सर्व काही आलबेल नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले असून, आगामी राजकीय घडामोडींना यामुळे वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# मनपाच्या मोक्याच्या जागा परत ताब्यात घ्या!

## आर्थिक उत्पन्न वाढवण्यासाठी मनसेची आयुक्तांकडे मागणी

जन सम्राट टाईम्स

**धुळे :** धुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या मोक्याच्या जागा व मालमत्ता नाममात्र दराने खाजगी व्यक्ती व संस्थांच्या वापरात असल्याचा मुद्दा उपस्थित करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या जनहित विभागाने मनपा प्रशासनाकडे गंभीर मागणी केली आहे. महानगरपालिकेच्या मालमत्तांची तातडीने तपासणी करून त्या पुन्हा मनपाच्या ताब्यात घेण्यात याव्यात व त्याद्वारे मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढवावे, अशी मागणी मनसेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र विश्राम बैसाणे यांनी निवेदनाद्वारे आयुक्तांकडे केली आहे. मा. अप्पर मुख्य सचिव, महसूल, नोंदणी व मुद्रांक शुल्क विभाग यांच्या दि. ०९ एप्रिल २०२६ रोजीच्या शासन पत्राचा दाखला देत हे निवेदन सादर करण्यात आले आहे. सदर परिपत्रकात सन १९५० पासूनच्या शासन मालमत्तांच्या ७/१२ उताऱ्यावर शासनाचे नाव नोंदविण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली हे पत्र प्रसिद्ध झाल्याचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे.

मनसेच्या निवेदनात म्हटले आहे की, धुळे महानगरपालिकेच्या अनेक मालमत्तांवर शासन अथवा मनपाचे नाव असतानाही त्या जागा अत्यल्प दराने खासगी वापरासाठी देण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत



### मनपाने जागांची सखोल चौकशी करून त्या ताब्यात घ्याव्यात

मनसेच्या निवेदनात म्हटले आहे की, धुळे महानगरपालिकेच्या अनेक मालमत्तांवर शासन अथवा मनपाचे नाव असतानाही त्या जागा अत्यल्प दराने खासगी वापरासाठी देण्यात आल्या आहेत. महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असताना अशा जागांचा योग्य वापर करून आर्थिक स्रोत वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपाने अशा जागांची सखोल चौकशी करून त्या ताब्यात घ्याव्यात व शहराच्या विकासासाठी त्यांचा उपयोग करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

बिकट असताना अशा जागांचा योग्य वापर करून आर्थिक स्रोत वाढविणे आवश्यक आहे. त्यामुळे मनपाने अशा जागांची सखोल चौकशी करून त्या ताब्यात घ्याव्यात व शहराच्या विकासासाठी त्यांचा उपयोग करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच शासनाच्या निर्देशानुसार संबंधित प्रक्रिया पूर्ण करून अहवाल दि. ०१ ऑगस्ट २०२६ पूर्वी शासनाकडे सादर करणे अपेक्षित असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे मनपा प्रशासनाने तातडीने या विषयाकडे लक्ष देऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी मागणी मनसेकडून करण्यात आली आहे. या निवेदनाच्या प्रती महसूल मंत्री, धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री, आमदार अनुप अग्रवाल तसेच जिल्हा भूमी अधीक्षक यांनाही पाठविण्यात आल्या आहेत. मनसेने उपस्थित केलेल्या या मुद्द्यामुळे शहरातील मनपा मालमत्ता आणि त्यांच्या वापराबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.

Selected

## मुख्यमंत्री फडणवीस ॲक्शन मोडमध्ये

**मुंबई :** मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या जागतिक तेल संकटाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंधन बचतीसाठी स्वतः पुढाकार घेत आदर्श निर्माण केला आहे. काल मंत्रालय ते विधानभवन असा दुचाकीवरून प्रवास केल्यानंतर आज त्यांनी विशेष शासकीय विमान टाळत सर्वसामान्य प्रवाशांसोबत इंडिगो विमानाने प्रवास केला. मुख्यमंत्र्यांच्या या कृतीची राज्यभरात जोरदार चर्चा होत असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाला त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून प्रतिसाद दिल्याचे पाहायला मिळत आहे. मध्य पूर्वेत इराण, इस्त्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक तेल पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. हॉर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी तेल वाहतूक अडथळ्यात आल्याने अनेक देशांसमोर इंधन संकट उभे ठाकले आहे. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किंमती झपाट्याने वाढत असून, भारतासारख्या आयातदार देशांवर याचा मोठा आर्थिक परिणाम होत आहे.

# पाणी द्या, नाहीतर आंदोलन भडकणार!

## माहिंदळे ग्रामस्थांचे तहसीलसमोर आमरण उपोषण सुरू

जन सम्राट टाईम्स



**भडगाव प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील मौजे माहिंदळे गावात जल जीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेच्या कथित निकृष्ट दर्जाच्या कामाविरोधात ग्रामस्थांचा संताप अखेर रस्त्यावर उतरला आहे. गावातील भीषण पाणीटंचाई, वारंवार खंडित होणारा पाणीपुरवठा आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शुक्रवार दि. १५ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून भडगाव तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. देविदास पाटील, पृथ्वीराज पाटील, राजेंद्र पाटील आणि सुनील पाटील यांनी उपोषणाला बसत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. "जल जीवन मिशनसारखी महत्त्वाकांक्षी योजना गावात आली खरी, पण निकृष्ट कामांमुळे नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे," असा आरोप उपोषणकर्त्यांनी केला. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, पाणीपुरवठा योजनेअंतर्गत टाकण्यात आलेली पाइपलाइन निकृष्ट दर्जाची असून विविध तांत्रिक त्रुटींमुळे गावात नियमित पाणीपुरवठा होत नाही. अनेकदा पाणीपुरवठा अचानक बंद पडतो, तर काही भागांमध्ये पाणीच पोहोचत नसल्याची तक्रार आहे. परिणामी महिलांसह ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत असून उन्हाळ्याच्या झळांमध्ये नागरिकांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी यापूर्वी २० एप्रिल २०२६ रोजी तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित विभागांकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती. त्यावेळी प्रशासनाने आठ दिवसांत दुरुस्ती करून पाणीपुरवठा सुरळीत करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांचा संताप अधिकच वाढला आहे. "आश्वासनांचा कंटाळा आला आहे, आता कायमस्वरूपी तोडगा हवा," अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे. संबंधित कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच गावाला तातडीने नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी उपोषणकर्त्यांनी केली आहे. दरम्यान, या आंदोलनाला गावकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळत असून तहसील कार्यालय परिसरात ग्रामस्थांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. महिलांनीही आंदोलनात सहभाग घेत प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. निवेदनावर अनेक ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या असून, प्रशासनाने प्रश्न तातडीने मार्गी न लावल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

आता प्रशासन या प्रश्नावर कितपत गंभीरपणे निर्णय घेते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.अनेकदा पाणीपुरवठा अचानक बंद पडतो, तर काही भागांमध्ये पाणीच पोहोचत नसल्याची तक्रार आहे. परिणामी महिलांसह ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी पायपीट करावी लागत असून उन्हाळ्याच्या झळांमध्ये नागरिकांचे हाल होत आहेत. या गंभीर समस्येबाबत ग्रामस्थांनी यापूर्वी २० एप्रिल २०२६ रोजी तहसीलदार, गटविकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी तसेच संबंधित विभागांकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली होती.

जन सम्राट टाईम्स — विशेष बातमी

# धरणगाव-पाळधी पोलिसांची कारवाई

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव व पाळधी पोलिसांनी संयुक्तरीत्या केलेल्या धडक कारवाईत एका संशयिताला गावठी पिस्तुलासह अटक करण्यात आल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. गिरणा नदीपात्र परिसरात सुरू असलेल्या शोध मोहिमेदरम्यान ही कारवाई करण्यात आली असून, पोलिसांनी आरोपीकडून २५ हजार रुपये किमतीचे गावठी पिस्तुल आणि मॅगझिन जप्त केले आहे. जळगाव जिल्ह्यात अवैध शस्त्रे व गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी सर्व पोलीस ठाण्यांना विशेष शोध मोहीम राबविण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार विविध भागात पथके स्थापन करून तपास व कारवाया सुरू आहेत. याच मोहिमेअंतर्गत पाळधी पोलीस चौकीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कोते हे आपल्या पथकासह दोनगाव शिवारातील गिरणा नदीपात्र परिसरात अवैध वाळू उपसा रोखण्यासाठी गस्त घालत होते. यावेळी आव्हाणे ता. जळगाव येथील आनंदा बळीराम सपकाळे हा इसम संशयास्पदरीत्या फिरताना आढळून आला. पोलिसांनी त्याला थांबवून विचारपूस केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. त्यामुळे संशय अधिक बळावल्याने पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अप्पर पोलीस अधीक्षक कविता नेरकर तसेच चोपडा विभागाचे पोलीस उपविभागीय अधिकारी अण्णासाहेब घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. धरणगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनील पवार, पाळधीचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश कोते, दत्तात्रय बडगुजर, ज्ञानेश्वर बावीस्कर, रविंद्र चौधरी आणि विशाल पाटील यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# छ.संभाजी महाराज जयंतीनिमित्त मतिमंद विद्यार्थ्यांसाठी मदत

## सामाजिक बांधिलकीचा उपक्रम

जन सम्राट टाईम्स




**भडगाव:** छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अखिल भारतीय मराठा महासंघ भडगाव आणि अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ भडगाव तालुका यांच्या संयुक्त विद्यमाने वनकोठे (ता. एरंडोल) येथील सहवास मतिमंद निवासी मुलांच्या शाळेत विद्यार्थ्यांसाठी फळ आहार व शालेय साहित्य वाटपाचा हृदयस्पर्शी उपक्रम उत्साहात पार पडला. विशेष मुलांसोबत आनंदाचे क्षण वाटत त्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य आणि उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केलेल्या भावना यामुळे कार्यक्रमाला भावनिक स्वरूप प्राप्त झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेत्या महानंदाताई पाटील या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून वनकोठेचे सरपंच उमेश पाटील उपस्थित होते. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे उत्तर महाराष्ट्र संपर्कप्रमुख डॉ. बी. बी. भोसले, अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाचे जळगाव जिल्हाध्यक्ष भानुदास महाजन, जिल्हा संपर्कप्रमुख भरत चव्हाण, भडगाव तालुकाध्यक्ष निलेश महाले, उपाध्यक्ष हर्षल चौधरी, समन्वयक समाधान पाटील तसेच अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघ भडगाव तालुका सचिव तथा मराठा महासंघाचे भडगाव तालुकाध्यक्ष यशकुमार पाटील यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना फळ आहार, वह्या, पेन तसेच विविध शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. विशेष मुलांशी संवाद साधताना उपस्थितांनी त्यांच्या कलागुणांचे कौतुक करत त्यांना आत्मविश्वासाने जीवन जगण्याचा संदेश दिला. समाजातील प्रत्येक घटकाने अशा विशेष मुलांच्या शिक्षणासाठी, संगोपनासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. यावेळी बोलताना मान्यवरांनी छत्रपती संभाजी महाराजांचे कार्य, त्याग आणि समाजहिताची भूमिका यांचा उल्लेख करत त्यांच्या जयंतीनिमित्त समाजोपयोगी उपक्रम राबविणे हीच खरी अभिवादनाची भावना असल्याचे सांगितले.

### शाळेतील वातावरण झाले उत्साहपूर्ण

केवळ औपचारिक कार्यक्रम न घेता समाजातील गरजू, दिव्यांग आणि विशेष मुलांसाठी कार्य करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, असे आवाहनही करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी मान्यवरांचे स्वागत करत आनंद व्यक्त केला. शाळेतील वातावरण उत्साहपूर्ण झाले होते. विद्यार्थ्यांसोबत संवाद साधताना अनेक मान्यवर भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. काही विद्यार्थ्यांनी कला व सांस्कृतिक सादरीकरणातून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सावंत सर यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन यशकुमार पाटील यांनी मानले.

# भडगांव तालुका हादरला, अल्पवयीन मुलीवर अत्याचार!




जन सम्राट टाईम्स

**भडगाव ।| प्रतिनिधी:** तालुक्यातील एका गावातील अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याने ती गर्भवती राहिल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली असून या प्रकरणी भडगांव पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक केली आहे. या घटनेमुळे परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी ही भडगाव तालुक्यातील एका गावातील रहिवासी आहे. आरोपींनी ओळख वाढवत विश्वास संपादन करून तिला वेगवेगळ्या कारणांनी भेटण्यासाठी भाग पाडल्याचा आरोप आहे. त्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्यात आल्याचे समोर आले. पीडित मुलीने घडलेला प्रकार कुटुंबीयांना सांगितल्यानंतर त्यांनी तात्काळ भडगांव पोलिस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गांभीर्याने दखल घेत तात्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान सिमा पद्म परदेशी व तेजस मराठे या दोन्ही संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरोधात पोस्को कायद्यासह विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. याबाबतचा पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक सुशिल सोनवणे हे करीत आहेत.

# नशिराबादच्या प्रवेशद्वाराला अंधाराचे ग्रहण

## देखण्या रोषणाईची एक बाजू बंद, नागरिकांकडून दुरुस्तीची मागणी

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद प्रतिनिधी:** जळगाव-भुसावळ महामार्गावरील नशिराबाद शहराचे आकर्षण ठरणारे भव्य प्रवेशद्वार सध्या अर्धवट अंधारात झाकोळल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शहराच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी उभारण्यात आलेल्या या प्रवेशद्वारावरील आकर्षक डेकोरेशन लाईट्सपैकी एका बाजूची रोषणाई गेल्या काही दिवसांपासून बंद पडली असून, त्यामुळे संपूर्ण प्रवेशद्वाराचे सौंदर्य फिके पडले आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असून, नगर प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. रात्रीच्या वेळी हे प्रवेशद्वार रोषणाईमुळे विशेष आकर्षक दिसत होते. महामार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांचे लक्ष वेधून घेणारे हे प्रवेशद्वार नशिराबादची ओळख बनले होते. मात्र आता एका बाजूचे लाईट बंद पडल्याने प्रवेशद्वाराचा अर्धा भाग प्रकाशात तर उर्वरित भाग अंधारात दिसत आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यावर विपरीत परिणाम होत असून, प्रवाशांमध्येही याबाबत चर्चा रंगत आहे. एका जागरूक वाहनधारकाने या समस्येचे छायाचित्र आपल्या कॅमेऱ्यात टिपल्यानंतर हा प्रकार समोर आला. त्यानंतर नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. "शहराचे प्रवेशद्वार हे शहराचा चेहरा असतो. तेच जर अंधारात असेल, तर बाहेरून येणाऱ्या नागरिकांमध्ये चुकीचा संदेश जातो," अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. महामार्गावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत शहराच्या प्रवेशद्वारावरील रोषणाई बंद असणे ही बाब प्रशासनाच्या उदासीनतेचे द्योतक असल्याची टीका होत आहे. विशेष म्हणजे, बंद पडलेले लाईट दुरुस्त करणे हे फार मोठे किंवा खर्चिक काम नसतानाही त्याकडे दुर्लक्ष का केले जात आहे, असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. स्थानिकांच्या मते, शहराच्या सौंदर्यीकरणासाठी लाखो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या प्रकल्पांची नियमित देखभाल करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. केवळ उद्घाटनापुरतेच सौंदर्यीकरण न करता त्याची निगा राखणे ही प्रशासनाची जबाबदारी असल्याचेही नागरिकांनी सांगितले. दरम्यान, नशिराबाद नगर प्रशासनाने तातडीने दखल घेऊन बंद पडलेले डेकोरेशन लाईट सुरू करावेत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. "प्रवेशद्वार हे शहराचे वैभव आहे. ते कायम प्रकाशमय आणि आकर्षक दिसावे," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.


### शहराचे प्रवेशद्वार हे शहराचा चेहरा असतो

नागरिकांनी सोशल मीडियाच्या माध्यमातूनही प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. "शहराचे प्रवेशद्वार हे शहराचा चेहरा असतो. तेच जर अंधारात असेल, तर बाहेरून येणाऱ्या नागरिकांमध्ये चुकीचा संदेश जातो," अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. महामार्गावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा सुरू असते. अशा परिस्थितीत शहराच्या प्रवेशद्वारावरील रोषणाई बंद असणे ही बाब प्रशासनाच्या उदासीनतेचे द्योतक असल्याची टीका होत आहे.

# कृष्ण गीता नगरमध्ये पाण्याचा अपव्यय

## वारंवार तक्रारीनंतरही प्रशासनाचे दुर्लक्ष; हजारो लिटर पाणी रस्त्यावर

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव। प्रतिनिधी :** धरणगाव शहरातील जी.एस. नगरजवळील कृष्ण गीता नगर परिसरात नगरपरिषदेच्या पाईपलाईनला मोठ्या प्रमाणावर गळती लागली असून, ऐन उन्हाळ्यात मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी करूनही नगरपरिषद प्रशासनाकडून कोणतीही ठोस दखल घेतली जात नसल्याचा आरोप स्थानिक रहिवाशांनी केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कृष्ण गीता नगर गट नंबर ४७५ मधील रहिवासी निलेश गुरव यांच्या घराजवळील नगरपरिषदेची पाईपलाईन लिकेज झाली आहे. नळाला पाणी आल्यानंतर तब्बल दोन तास पाणी सतत रस्त्यावर वाहत असल्याने मोठ्या प्रमाणावर पाणी वाया जात आहे. या गळतीमुळे रस्त्यावर पाणी साचून चिखल निर्माण होत असून, ये-जा करणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. स्थानिक रहिवासी निलेश गुरव, राजेंद्र भोई आणि महेंद्र बिवाल यांनी या समस्येबाबत अनेक वेळा नगरपरिषद प्रशासनाकडे तक्रारी दिल्या आहेत. मात्र, अद्याप कोणतीही दुरुस्ती न झाल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. "एकीकडे शहरातील अनेक भागांमध्ये नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे, तर दुसरीकडे हजारो लिटर पाणी रस्त्यावर वाहून जात आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना प्रशासनाचे दुर्लक्ष नागरिकांच्या नाराजीचे कारण ठरत आहे.

# परराज्यातील कंत्राटदाराचा मराठी तरुणांवर घाला!

## दीडशे टोल कर्मचाऱ्यांचे साखळी उपोषण सुरू

जन सम्राट टाईम्स




**धुळे | प्रतिनिधी :** मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावरील ललिंग टोलनाका येथे परराज्यातील कंत्राटदाराकडून स्थानिक मराठी तरुणांवर अन्याय होत असल्याचा गंभीर आरोप समोर आला असून, रोजगार हिरावला जात असल्याने संतप्त झालेल्या सुमारे दीडशे टोल कर्मचाऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केले आहे. धुळे व चांदवड टोल नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी थेट टोलनाका परिसरात आंदोलन छेडत न्यायाची मागणी केली आहे.ललिंग टोल नाक्यावर यापूर्वी कार्यरत असलेल्या आय एस टी पी एल कंपनीचे कंत्राट संपल्यानंतर राजस्थानच्या रोड लिंक इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडे नवीन कंत्राट देण्यात आले. मात्र, नवीन कंपनीने मोजक्याच कर्मचाऱ्यांना कामावर ठेवले जाईल, अशी तोंडी सूचना दिल्याने गेली अनेक वर्षे सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. गेल्या पंधरा वर्षांपासून रुग्णवाहिका सेवा, रोड मेंटेनन्स, पेट्रोलिंग, अग्निशमन आणि क्रेन विभागात प्रामाणिकपणे काम करणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांना अचानक कामावरून दूर करण्याचा प्रयत्न होत असल्याने संतापाची लाट उसळली आहे. "आम्ही वर्षानुवर्षे सेवा दिली, आता परराज्यातील कंपनी येऊन आमच्यावर अन्याय करत आहे," अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली. दरम्यान, या आंदोलनाची दखल घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे पदाधिकारी आंदोलनस्थळी दाखल झाले. शिवसेनेचे संपर्कप्रमुख अशोक धात्रक यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या प्रोजेक्ट डायरेक्टरशी थेट संपर्क साधत कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर तीव्र नाराजी व्यक्त केली. यावेळी "स्थानिक कर्मचाऱ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही," असे आश्वासन प्रोजेक्ट डायरेक्टर यांनी दिल्याची माहिती आंदोलनकर्त्यांना देण्यात आली. तथापि, अद्याप लेखी आदेश न मिळाल्याने कर्मचाऱ्यांमध्ये संभ्रम कायम आहे. "आम्हाला तोंडी आश्वासन नको, तर सेवेत कायम ठेवण्याचा स्पष्ट निर्णय हवा," अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली आहे. आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, जर सर्व कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत सामावून घेण्याचा निर्णय तातडीने घेतला गेला नाही, तर संपूर्ण कुटुंबासह राष्ट्रीय महामार्गावर चक्काजाम आंदोलन छेडण्यात येईल. तसेच 'बिरहाड आंदोलन' करत महामार्गावरच ठिय्या मांडण्याचा निर्धारही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# भडगावात आधुनिक "नमो गार्डन"चे भूमिपूजन उत्साहात

## आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या प्रयत्नातून साकार होणार आकर्षक आणि हिरवेगार उद्यान

जन सम्राट टाईम्स




**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव शहराच्या सौंदर्यात भर घालणारे आणि नागरिकांसाठी विरंगुळ्याचे आकर्षक ठिकाण ठरणारे आधुनिक "नमो गार्डन" लवकरच साकार होणार आहे. प्रभाग क्रमांक ८ मध्ये उभारण्यात येणाऱ्या या भव्य-दिव्य गार्डनच्या भूमिपूजन सोहळ्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात पार पडला. कार्यसम्राट आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साकारत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन लोकनियुक्त नगराध्यक्षा रेखाताई मालचे, उपनगराध्यक्ष राजेंद्र जिभू पाटील, पाचोरा नगरपालिकेचे गटनेते सुमितदादा पाटील, भडगाव नगरपालिकेचे गटनेते लखीचंद भाऊ पाटील, बांधकाम सभापती नगमा बी. अलिम शहा, प्रभाग क्रमांक ८ च्या नगरसेविका सौ. समीक्षाताई पाटील आणि नगरसेवक अमोलभाऊ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक, नगरसेविका, शिवसैनिक तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. भूमिपूजन सोहळ्यात नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विकासकामाचे स्वागत केले. हे "नमो गार्डन" आधुनिक सुविधा, आकर्षक रचना आणि हिरवाईने नटलेले असणार असून नागरिकांसाठी सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी, मुलांच्या खेळासाठी आणि कुटुंबांसाठी एक सुंदर विरंगुळ्याचे ठिकाण ठरणार आहे. शहराच्या विकासात हे उद्यान आणखी एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. कार्यक्रमास नगरसेवक युवराज पाटील, विजयकुमार भोसले, संतोष पाटील, विशाल पाटील, इम्रानअली सैय्यद, डॉ. प्रमोद पाटील, सुधाकर पाटील, समाधान पाटील, रावसाहेब पाटील, प्रकाश भंडारी, आबा चौधरी, बबलू देवरे, जहागीर मालचे, महेंद्र ततार, निशांत सोमवंशी, सागर शेंडे, प्रितम भंडारी, गौतम मारवाडी आदी मान्यवर उपस्थित होते. शहरातील नागरिकांसाठी हे आधुनिक आणि "नमो गार्डन" आकर्षणाचे ठरणार असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

### या मान्यवरांची होती उपस्थिती

कार्यसम्राट आमदार किशोरआप्पा पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून साकारत असलेल्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे भूमिपूजन लोकनियुक्त नगराध्यक्षा रेखाताई मालचे, उपनगराध्यक्ष राजेंद्र जिभू पाटील, पाचोरा नगरपालिकेचे गटनेते सुमितदादा पाटील, भडगाव नगरपालिकेचे गटनेते लखीचंद भाऊ पाटील, बांधकाम सभापती नगमा बी. अलिम शहा, प्रभाग क्रमांक ८ च्या नगरसेविका सौ. समीक्षाताई पाटील आणि नगरसेवक अमोलभाऊ पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगरसेवक, नगरसेविका, शिवसैनिक तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.